**CNR No.MHST120006202021**

**नियमीत दिवाणी दावा नं. २४६/२०२१ मधील नि. ८ वरील आदेश**

वादींनी प्रस्तुतचा दावा हा मौजे पुकळेवाडी येथील जमीन मिळकत गट क्र. ३९८ व ४७४ बाबत केलेला असून, सदर दाव्यात अतिक्रमित क्षेत्राचा ताबा वादीस परत मिळावा म्हणून, मनाई हुकूम मिळावा म्हणून विनंती केलेली आहे.

२. वादीने नि. क्र. ८ वरील अर्जात असे कथन केले आहे की, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूने लागून प्रतिवादी यांची मिळकत ही नकाशात दर्शविल्याप्रमाणे असून वादी हे आपल्या मिळकतीचे मालकीहक्काने ताब्यात आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा वादीच्या मिळकतींशी काहीही संबंध नसताना त्यांनी दि.२५.११.२०२१ रोजी वादीच्या मिळकतीच्या पश्चिम बाजूस असणारे हद्दी व खुणाचे दगड काढून वादीच्या दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी ०.४आर क्षेत्रात अतिक्रमण करून पिकांची नासधुस केली आहे. अशा रितीने प्रतिवादी यांनी वादीच्या एकूण ०.८आर क्षेत्रात अतिक्रमण केले असून सदरचे अतिक्रमण काढून मिळणेची विनंती केली आहे. त्याकरीता वाद मिळकतीची मोजणी करणे आवश्यक असल्याने त्याकामी उप–अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, दहिवडी यांच्या मार्फत मोजणी होवून मिळणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना दावा समन्सची बजावणी होवून देखील ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर न झाल्याने, सदर दाव्याचे कामकाज व अर्जाचे कामकाज हे त्यांच्या विरूध्द एकतर्फी चालविण्यात आले.

४. वादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा दावा, सदरचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की वादीने सदरचा दावा हा मौजे. पुकळेवाडी येथील गट क्र.३९८ व ४७४ बाबत दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी हे सदर वाद मिळकतीच्या पश्चिम बाजूने लगतचे धारक आहेत. प्रतिवादींनी वादींच्या पश्चिम बाजूने असणा–या मिळकतीच्या हद्दी व खुणा नष्ट करून दोन्ही मिळकतींमध्ये प्रत्येकी ०.४आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेले आहे. त्याबाबत वादीने तसा कच्चा नकाशा दाव्यासोबत दाखल केलेला आहे.

५. वादीने सदर दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या हद्दी व खुणा निश्चित होवून मिळाव्यात, निरंतर मनाईचा हुकूम मिळावा अशी विनंती केली असली तरी देखील दाव्याच्या कथनांमध्ये अतिक्रमणाबाबतची बाब स्पष्टपणे नमूद केलेली आहे. मात्र त्या अनुषंगाने विनंती कलमामाध्ये अतिक्रमण काढून मिळणेबाबतची विनंती सामील केलेली नाही. जरी वादीने सदर स्वरूपाची विनंती दाव्यात दाखल केली नसली तरी दाव्यातील विषयाचे अनुषंगाने दावा मिळकतीतील अतिक्रमण दिसून येण्याकामी वाद मिळकतीची मोजणी ही तज्ञ व्यक्तींच्या मार्फत होणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६ नियम ९ प्रमाणे सदर स्वरूपाची मोजणी होणे हे अतिक्रमणाचे दाव्यात आवश्यक ठरते. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादींनी नेमके किती अतिक्रमण वादीचे मिळकतीत केलेले आहे हे मोजणी केल्याखेरीज अभिलेखावर दाखल होऊ शकणार नसल्याने सदरचा अर्ज हा मंजूर होणेस पात्र ठरतो. यामुळे न्यायाचे हिताचे दृष्टीने मोजणी होणे आवश्यक आहे. सबब वर नमूद बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी ८ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येतो.

२. तालूका निरिक्षक भूमी अभिलेख, दहिवडी (माण) यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. तालूका निरिक्षक भूमी अभिलेख, दहिवडी (माण) यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी मौजे.पुकळेवाडी येथील दावा जमिन गट क्र. ३९८ व ४७४ चे संपूर्ण क्षेत्राची मोजणी मुळ अभिलेखाचे अवलोकन व आधार घेवून करून, त्यांच्या हद्दी खूणा दाखवून, त्या बाबतचा नकाशा तयार करावा, अतिक्रमण आढळून आल्यास तसे नकाशात दर्शवून त्याबाबतमचा अहवाल नकाशासह त्यांनी प्रस्तुत आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयास सादर करावा.

४. तालूका निरिक्षक भूमी अभिलेख, दहिवडी (माण) यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी नियमाप्रमाणे वादी, प्रतिवादी तसेच लगत धारकांना नोटीसा काढून त्यांच्या समक्ष सर्व्हे मॅन्युअल मधील पध्दतीचा अवलंब करुन मोजणीची कारवाई करावी.

५. तालूका निरिक्षक भूमी अभिलेख, दहिवडी (माण) यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी नियमाप्रमाणे वादी, प्रतिवादी तसेच लगत धारकांना नोटीसा काढून त्यांच्या समक्ष सर्व्हे मॅन्युअल मधील पध्दतीचा अवलंब करुन मोजणीची कारवाई करावी.

६. वादी यांना आदेश करण्यात येते की त्यांनी आवश्यक ते सर्व वाद मिळकतीचे ७/१२ उतारे, दाव्याची प्रत, अर्ज व आदेश वगैरे कागदपत्रे मोजणी अधिकारी यांना उपलब्ध करून द्यावेत.

७. वादीने तालूका निरिक्षक भूमी अभिलेख, दहिवडी (माण) यांची कायदेशीर फी ही संबंधित कार्यालयात आजपासून १५ दिवसांचे आत भरुन त्या बाबतची पावती ही न्यायालयात दाखल करावी अन्यथा पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल.

८. येणेप्रमाणे मोजणी आयोगपत्र पाठविण्यात यावे.

Rajiv Babasaheb Bahirwal

Digitally signed by Rajiv Babasaheb Bahirwal
Date: 2023.02.17 16:16:15 +0530

म्हसवड. **(रा.बा.बहिरवाल)**

दि.१७.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J.A. Patel , Stenographer (Grade III) |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 17.02.2023 |
| Order signed by the P.O. on | 17.02.2023 |
| Order uploaded on | 17.02.2023 |